# १. जनीजनार्दन

१ बालेघाटी बीडशहरी पाटांगण नावाचे एक देवस्थान आहे. पाटांगण म्हणजे पाटे (एकवचन पाटा) ठेवण्याची कचेरी. मुसुलमानांचे राज्य देवगिरीस इ.स.१३१८ झाल्यावर काही वर्षे बालेघाटांत बीड व जोगाईचे आंबे या दोन शहरी स्वतंत्र संस्थानिक राज्य करीत होते. या संस्थानिकांचे सार्वजनिक कागदपत्रांचे दफ्तर ठेवण्याच्या कचेरीस पाटांगण अशी संज्ञा असे पत्रा पट्टा पाटा अशा परंपरेने पाटा हा शब्द सध्याच्या मराठीत आला आहे. मुसुलमानांच्या पूर्वी व हेमाद्रीच्यावेळी व पूर्वी हे सार्वजनिक पाटे पाटांगणात ठेवीत व त्या पाटांगणाच्या मुख्य अधिकाऱ्याला पाटेलू म्हणजे पाटे ज्याच्या ताब्यात असत तो अधिकारी म्हणत. याच पाटेलू शब्दापासून प्रस्तुतचा पाटील शब्द निघाला आहे. हे पाटे पूर्वी तांब्याचे किंवा भूर्जपत्रांचे असत परंतु पुढे कागदाचे होऊ लागले. या कागदाच्या पाटांचा उल्लेख ज्ञानेश्वरीत झाला आहे. भूर्जपत्र या शब्दांचे भुजपाट असे रुप तेराव्या व चवदाव्या शतकांतील कित्येक मराठी लेखात आढळते

२. बीड येथील पाटांगणाचे वर्तमान अधिकारी हरिभक्तिपरायण मथुरानाथ गोसावी, संस्थान तीर्थ पाटांगणावर हे आहेत. हे प्रसिद्ध महाराष्ट्रभक्त जनीजनार्दनस्वामी यांचे वंशज होत. यांची वंशावळ पुढील पानावर दिली आहे.

३. एकनाथस्वामींचे गुरू ते जनार्दनस्वामी त्यांच्याहून हे जनीजनार्दन निराळे आहेत हे प्रसिद्ध आहे. या जनीजनार्दनांचे आडनाव गोसावी. हे विजापूरच्या पातशाहीत कमाविसदार होते. एकदा दुष्काळ पडला असता, यांनी सरकारी कोठारे गरिबांकडून लुटविली. अर्थात या बेकायदा व बिगरपरवाना वर्तमानाबद्दल पातशाहाने यांना दोष दिला व विजापूरास धरून नेले. बिगरपरवाना सरकारी कोठारे का लुटविली असा पातशाहाने सवाल केला असता यांनी खालील ओवीबद्ध रोकडा जबाब दिला :

जितुकें खर्चिले उदरास।<br>
स्त्री, सुत आणि कन्यकेस ।।<br>
तितुकें मजकडे, इतरास।<br>
दानधर्मी योजिलें।।

१.जनीजनार्दन

२. नारायण

राघव

३. देवस्वामी

४. पुरुषोत्तम

५. महादेव

६. गंगाधर

७. गोविंद

८. विद्याधर

९. विनायक

१०. मथुरानाथ (इ.स. १९०३) वर्तमान

११. गंगाधर

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

या ओव्या जनीजनार्दनाच्या एका ओवीबद्ध आधुनिक चरित्रांतील आहेत. असला परोपकारी मामलदार निर्दय व पाषाणहृदयी सरकारला कसा खपणार? सदर भूतदयेच्या कृत्याबद्दल जनार्दनपंताला मस्त हत्तीच्या पायाखाली चिरडून मारविण्याची शिक्षा झाली. परंतु चमत्कार असा की, या साधुपुरुषाच्या शांत मूर्तीला स्पर्श करण्याचे त्या मस्तवाल पशूलाही धैर्य होईना ! असा जेव्हा प्रकार झाला, तेव्हा पातशाहाने जनार्दनपंतला सोडून दिले व पुन: नोकरीवर रूजू होण्याचा हुकूम फर्माविला. परंतु जनार्दनपंताची वृत्ती या अघोर संकटातून जातांना पूर्ण विरक्त बनली व त्याने यवनाची सेवा प्राणातीही करावयाची नाही असा निश्चय

केला इतकेच नव्हे, तर यापुढे जो कोणी आपल्या वंशात यवनाची सेवा करील तो कुलबाह्य समजला जाईल, अशी आपल्या वंशजांस शपथ घातली, ही शपथ बीड येथील पाटांगणांत अजूनही पाळली जाते.

४.यानंतर जनार्दनपंतांने आपले सर्व आयुष्य ईश्वरजनांत व लोकोपदेश करण्यात खर्चिले. जनार्दनपंतांचे उपास्य दैवत गणपती होते. त्याची स्थापना त्यांनी गंगामसले या गावी केली. पुढे प्रसिद्ध मुत्सद्दी हरिपंत फडके यांनी स्थापनेचा अडीचशे वर्षांनंतर उद्धार केला. गंगामसले हे गांव पैठणाजवळ आहे. जनार्दनपंत पंढरीची वारी करीत असे. जनार्दनपंत आपणास जनीजनार्दन म्हणून प्राय: कवितेत म्हणे. तेव्हा नावात घोटाळा होऊ नये म्हणून एकनाथस्वामी आपणास एकाजनार्दन म्हणवू लागले.

५. जनीजनार्दन, शके १५२३, श्रावण वद्य ७, अभिजित मुहूर्ती, म्हणजे इ.स. १६०१ त, समाधिस्थ झाले.

६. यांची भाषा दासोपंताच्या भाषेसारखी आहे. दासोपंताची भाषा कशी होती, हे पुष्कळांना माहित असण्याचा संभव नसल्यामुळे एक दोन पदे देतो व नंतर जनीजनार्दनाची दोन तीन देतो.

## दासोपंताची पदे

(१)

राग: - (कांवोद - मल्हार)
पैलु कागु बोले काये?
माझा नयनु स्पंदतु आहे.
दत्तु अझुणी कां नये?
मन वेधले, परति न लाहे.
वियोगु आंगी न साहे,
त्रिविध तापु बाधिताहे
जा, वो! वेगु करा, माये!
याचे दाखवा येकु वेळ पाये ।।१।। धृ
आतां न धरवे धीरु
लागला भवविखारु,
दूजा नेणे उपचारु
एकु समर्थु श्री आदिगुरु ।।छ।।
देवो गुरु, बापु, माये!
दत्तु आत्मा माझा, सैये।

तयाची वाट मी पाहे,
सवें जाइन,पुडती न ये
आनंदु आजि वाटताहे!
भाव पालटले, गे! बाईये!
दिगंबरी भेटि होये,
ऐसे चिन्ह भासताहे।।२।।

या पदांत विरहिणी नायिका,नायक जो दत्तु त्याच्या भेटीविषयी उत्कठिंत झालेली कवीने वर्णिली आहे. येथे श्रृगांरसंवलित भक्तिरस प्रत्येक अक्षरांत भरला आहे.

(२)
राग - देशी

सेर खदिर सर्प संगति घडलीसे, चंदना! रे!
पासीं लसनराशि, कें गुणें उरसी चंदना? रे!
हृदय कठिण करी, परगुण न धरी, चंदना ! रे!
गुणा भुलसि तरि पडलीस बाहेरि, चंदना ! रे! ।।१।।
धृ ।। अरे रे रे रे रे रे रे! परिस तुं सजना! रे!
खळसंगु असतां साधुत्व काय उरे? सज्जना ! रे!
शिला पानीय वरि घसणी पडतीसे, चंदना ! रे !
करवत, कुठार तुजचि लागि पैल, चंदना ! रे!
घालुनि दहनावरी पाहों पाहाती थोरी, चंदना ! रे!
दिगंबरावांचून न धरीं आन साधू, चंदना ! रे!

ही अन्योक्ति मोठी रमणीय आहे

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

जनीजनार्दनची पदे

(१) राग - वैराटिका
तळहातीचे केस
विंचरीते गोरी!
वांजेचिया सूतें
धरलीसे करी ।।धृ।।
परता,परता, मी
बंध्येची सूता!

पतिव्रता मी
    माझी,रे! माता ।।१।।
आजी, पणजी,
    निपणजी तिजी
तिघी वांजा, आई
    तुझी आणि माझी ।।२।।
विचारिंता, तुम्ही
    आह्मी भावांऽडें,
न घडे सांगू,
    नवल दिसें कुंडे ।।३।।
तूं माझा पिता
    तुझी मी माता
येवढी आण आतां,
    न बोलैं तत्वता ।।४।।
तु माझा नातू?
    किं मी तुझी नाती?
जनार्दनु म्हणे,
    भ्रांति! हो भ्रांति ! ।।५।।

(२) राग - माळगौडा ।। केदारा

।।धृ।। अरे! अरे! आळया! तुं पाहिलें पाहिं ! रे!
अझुनु काय निद्सुरा ! तुज जाहालें काई? रे!
होई ठीक आसनीं तूं ठायींच्या ठायी रे!
फिरे बुद्धि, मागुता तूं हंस बाहीं राही, रे! ।।१।।

(३)

धरणी रक्षावया
    परब्रम्ह हरी
    गौळियाचा घरीं
    प्रगटला ।।धृ।।
तिहीं लोकीं जाला
    परम आनंदु

आनंदाचा कंदु
गोपी नाथु।।१।।
संपूर्ण अवतारु
नंदाचा नंदनु
म्हणत जनार्दनु
भक्तिप्रियु।।२।।

७. जनीजनार्दनाचीं १००।१५० पदे मजजवळ आहेत.

८. जनीजनार्दन हे नाथपंचकापैकी एक होते, असे ह. प. मथुरा नाथस्वामींचे म्हणणे आहे. नाथपंचकांत खालील साधु अंतर्होतात :

१. एकनाथस्वामी पैठणकर
२. जनीजनार्दन बीडकर
३. दासोपंत आंबेजोगाईकर
४. विठा रेणुकानंदन सोनठाणे गोलटगांवकर
५. केशवस्वामी भागानगरकर

९. विठा रेणुकानंदनांचे एक पद ह.प. मथुरानाथ गोसाव्यांनी म्हकटले तें फार चमत्कृतिजनक आहे म्हणून खालीं देतों.

उगवला दिनकरु
विश्व देखे डोळा,
न देखे आंधळा,
तरी काय सूर्यु नव्हे? ।।१।।
वाजे गाजे ध्वनि,
विश्व ऐके कांनी,
न पडे बधिरा श्रवणीं,
तरी काय नादु नव्हे? ।।२।।
पंचमालापस्वरें
शब्द करिती कोकिला,
नायके कावळा
तरी काय वसतु नव्हे? ।।३।।
तैसा आदि पुरुषाचा दासु
विठा रेणुकानंदन
न मानिती दुर्जन
तरी काय साधु नव्हे?।।४।।

१०. ह.प. मथुरानाथ गोसावी सांगतात की, उद्धवचिद्‌घन हा धारूरचा रहाणारा असून, यांचे आडनांव कोकिळ होते व हा रामदासस्वामींच्या वेळी यात होता. यास प्रमाण खालील उद्धवचिद्‌घनाचेच पद आहे.

ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा
त्याचे वंशी मज जन्म दे गा! देवा ! ।।१।।
वारंवार विनंति आयकावी
दयासिंधू ही सर्व सिद्धि न्यावी ।।२।।
ज्याची वाणी रंगली रामनामा,
त्यासी मजसी संवाद घडो, रामा!।।३।।
म्हणे उद्धवचिद्‌घन, महाराजा!
रामादासाचा संग घडो माझा ।।४।।

११. गोसावी मजकुरांनी ज्ञानेश्वरीसंबंधाने खालील दोन श्लोक म्हटले

स्वस्तिश्रीनृपशालिवाहनशके पंध्रा शतें साऽगळीं।
श्रीमत्पैठणिं तारणाख्यवरुषीं गोदावरीच्या कुळीं।।
षष्ठी कृष्ण कपील भाद्रपदिची ग्रंथार्थमूलन्वयें।
केलें शोधन ज्ञानदेवविप्रतिंचे श्री एकनाथें स्वयें ।।१।।
श्रीकार्ष्णव्यास इत्यग्रगनगनिस्सृता ज्ञानदेवी प्रयागे ।
संबद्धा केवलोक्तिग्रथनविवरणत्रिप्रवाहित्रिवेणी ।।
तैस्मिन्प्राप्ते सदैवे नतनुमकरे तच्छ्रुतिस्नानकृद्यः।
तीर्त्वा संसासिंधु सकलपितृगणैर्ब्रह्मसाम्राज्यमेति।।२।।

या दोन्ही श्लोकांवरून असे दिसते की,ज्या ग्रंथाला प्रस्तुत काळी ज्ञानेश्वरी असे म्हणतात त्याला ज्ञानदेवी म्हणण्याचा एकेकाळी परिपाठ होता.

१२. येणेप्रमाणे जनीजनार्दन, विठोरणुकानंदन व उद्धवचिद्‌घन यांचे काळ वरील हकीकतीवरून कायमचे ठरले. उद्धवचिद्‌घनासंबंधी आजपर्यंत फार घोटाळा असे. कोणी त्याला इसवीच्या तेराव्या शतकांत घालीत, कोणी सोळाव्यांत आणीत व कोणी तर महिपतीच्या बहुतेक जवळचा असे म्हणत. म्हणजे चारशे वर्षाच्या अवर्धीत उद्धवचिद्‌घनाची स्थापना कोठे करावी याबद्दल संशय होता, परंतु तो असण्याचे आता काही एक कारण नाही. उद्धवचिद्‌घन रामदासांच्या वेळी होता व तो रामदासांपेक्षा कदाचित वयांने लहान असावा.

१३. जनार्दनांने काही पदे व्रज भाषेतही लिहिली आहेत.

# २. मुकुंद

जशी देवदासांने संतमालिका लिहिली तशीच मुकुंदकवीनेही एक संतप्रशस्ती रचिली आहे. या मुकुंदकवीने देवदासानंतर दहा वीस वर्षांनी ही प्रशस्ती लिहिली असावी. सदर प्रशस्ती येणेप्रमाणे :

## श्रीरामवरद

प्रबंध।। माधव, मोहन, मंगळधाम, मुरारि, मुकुंद, मनोरम, ।। मधुसूदन, मन्मथकदन, प्रिय, पुराणपुरुषोत्तम,।। त्रिविक्रम, मुचुकुंदवरद, गोविंद , ।। स्तभंभेरतारण, नक्रनिवारण, नारायण, निर्गुण, सन्दुणधाम, घन:शाम।। मनोहर, मुरलीधर, गिरीधर, सुखकर, करुणाकार, पूर्णकृपाकर, दामोदर, दरहरसखा, धनुर्धर, धरणीधरभिदनुज, दनुजदमन, उदधिसदन, एक, जनार्दन, कमळवदन, अरविंदनयन, गरुडध्वज, अच्युत, अनंत, भगवंत, अधोक्षर, कृष्ण, चतुर्भुज, पंकजविष्ठरतात, जगन्नाथ, अनाथदीनबंधु, जगज्जीवन, दयासिंधु, सन्मूर्ति, साधुसंततपोधनसज्जनमनरंजन, भवभंजन, भुवनाधीश, भूपाळभूषण, शिशुपाळविनाशन, निर्जरवैरिशासन, जगदुद्धारण, धराधरतल्पशयन, धरामपाळन, धर्मसंरक्षण, सत्यसनातन, नतसनकादिकनारद अंबरुषीशुक वामदेववाल्मिव्यासवसिष्ठतपोनिधिअत्रिअगस्तिगौतमगार्ग्यभृषंडिकपिलाकात्यायनकौंडण्यकश्यपभृगुभारद्वाजशांडिल्यशौनकजमद्ग्निमांडव्य-मार्कंडेययाज्ञवल्किहंसबकदालभ्यलोमहर्षगर्गऋष्यशृंगअंगिराविश्वामित्रपाराशरऋषिचयभक्त समुदयजनकशृतदेवहरिनंदांगदनळनीळजांबुवंतहनुमंत ध्रवउपमन्यमैनिकाउद्धवविदुरअक्रुरगौतमीपुत्र भीमधनुर्धरधर्म, बिभिषणरामचंद्रपदपंकजस्मरत, यदुसुतअभिविंदित, संतत, कृपावंत।। चिन्मयवृत्तिस्वानंदवदनींछंद, ।। संतकविपोधनवृंद।। दत्त, एकजनार्दन, राघवसद्‌गुरु, विठ्ठल, मंगळ, केशव,वामन, रामदास, जयराम, कृष्ण, रामीरामदास दासबोधकथन, आनंदगोसावी वृंदावन डोलत, दासोपंत, शिवराम सदोदित, विठ्ठलरेणुकानंदन, जनार्दन, मंगळमूर्तिगणेशवरद वस्ती बीड निबिडभक्ति सनातन ज्ञाननिधि, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, केवळ ईश्वर विसा खेचर, नामा, विठा, नारा, बहिरो पिसा, परसा भागवत, केशवदास, परमानंद,

जोगा, विठ्ठल, भानुदास, पुरंदर, वेडानागा, कुरुमदास, चांगा, कनकदास, वडवाळसिद्ध, नागेश, बोखाविठा, संतीदास, मरुळ, माधवदास, चिंतामणि, रामानंद खंदारकर, श्रीरंगी रंगला रंगनाथ, तसाच जगन्नाथ, तुकोब्बा सदा प्रसन्नपंढरीनाथ, नरहरि सोनार, जगमित्र नागा, नरसी मेहता, नरसीदास, रामानंद, कबीर, रोहिदास, तुळसीदास, जनीजसवंत, वना जाट, पिपा रजपूत, सुरदास, सेवीबाई, मिराबाई सदाचित रामपायी, नंदनरामगोसावी आर्यावरी टीका केली एक नियमें वदावी ते रामस्वरुप दावी, साधुविभुषण माणिकभट्ट धरामरकोविदमंडित कऱ्हापुरी सतत राहत, भूतदयाघन उदार समर्थ गोसावीनंदन, सिद्धचरित्रकवित्व सुधामान्य संत विबुधां कृष्णदास बीडकर जनार्दनवंशकुळदीप, कथाकर्तन गीतप्रबंधझाप स्मरतां हरे ताप, पाप पळे, वृत्ती निवळे, सुख धाम सदा।। त्रिंबक रे घ्या अंकोळकर मुखीं नाम रामरमावर भूतदयाचित्तसुधाकर संतसमागमश्रुतिसारविचारनित्यनिरंतरगायनकीर्तननर्तनसुंदर अन्तर्निष्ठ गुरुभक्तिसात्त्विक धर्मपरायण कवित्व बरे मानिति पंडितभूसर वाणी रसाळ पदप्रबंधचालमनोहर ।। केसरिनाथसंप्रदायज्ञानेश्वर दीनबंधुवैराग्यधुरंधर, त्याचा शिष्य मल्लारिपंत बुद्धिदिवाकर, तया शरण जड-मूढ कुमति, पाखंड तमह, मार्तंड-भक्ति, सदा सांबशिवशंभुशंकरध्याननिरंतर, नामउच्चारसुखकर, स्वरूपी निर्धार, दीनदयापर, उद्धवचिद्धन, मध्वमुनीश्वर, श्रीधरगुरु गंगाधर कोकिळ, श्रीधरबाबा नित्य जपावा ।। ईश्वर केवळ संतदयार्णव, साधु निरंजन गोसावी, त्यांची पदें उत्तम गावीं, जरी पुण्य असेल प्राप्त ठेवीं, आळस न करावा, सपदी राम भजावा, सार्थक जन्म, संत भजावा, ते दीनदयाळ, सदेव कृपाळ, त्याचे चरणामृत सेवित. प्राप्त स्वरूपस्थिती संतत वदला सुवाची रसाळ, सद्‌गुरू विठ्ठल विठ्ठल मंगळ यादवबाळ ।। ब्रह्मानंद, परमानंद, गोपाळ सुकाळ सदय समीप राम नीळतमाळ प्रतापभवन, विशाळस्वानंदकल्लोळ, वदे रसना करुणावरुणालय. भक्तपालय, नित्य निरामय, चिन्मय, केशव, यादव, राघव, कृष्ण, विष्णु पंकजलोचन, मंगळमूर्ति, सन्मनिजीवन, रघुनंदनस्फूर्ति, सद्‌गुणकिर्ती, सुधारसनाम, सुखैकधाम ।। शंकरविश्राम श्रीरामभक्त महामुद्गलभट्ट, अवतारिनिष्ठ करुणापर बदला रामआर्या निजध्यासे मन राम नमोनि सकळसंती अघ्रिद्वयावृत्ती गेली ।। अपरोक्षानुभव ग्रंथ पहावया लोकीता ग्रंथ स्वानंदसुखप्राप्त नमिला श्रीशंकराचार्यप्रतापनिजसूर्यमतिवर्यशंकरभाष्य कथिलें।। तें अनुभव सुखगौरव भोगिती संत, सर्व कृपा एकजनार्दन देवाधिदेवप्राप्त मुकुंद सदासुखकंद सच्चिदानंद मृदुपदारविंद ध्यानीं संतत वदे माधव।।छ, छ, छ।।

एकनाथास्वामीच्या शिष्यपरंपरेपैकी हा मुकुंद कवि होता. यानें श्रीधर व उद्धवचिद्धन यांचा उल्लेख केला आहे. देवदासांने न वर्णिलेला त्र्यंबक अंकोळकर मुकुंदकवीने उल्लेखिला आहे व त्याचा पंदाचे मनोहारित्व वाखाणिले आहे. मोरोपंत, महीपती, अमृतराय वगैरेचा मुकुंदकवी उल्लेख करीत नाही, त्याअर्थी तो शक १६२२ पासून १६५० पर्यंतच्या काळांत होता असे म्हणावे लागते. श्रीधर, निरंजन, मध्वमुनीश्वर, मुद्गलभट्ट, मल्लारिकवी, त्र्यंबककवी, वगैरे शक १६२२ च्या सुमारास कवींचा व संतांचा समकालीन हा मुंकुद आहे, मुंकुदकवीचे

तीस चाळीस प्रबंध मजजवळ आहेत.

७५ श्लोकांचा एक प्रबंध आहे त्यातील एक श्लोक असा : -

तारादेवि मला कृपा करुनिया सांभाळिते तोषदा ।
सिद्धीच्या सुखराशि अंतरि बहू, धान्यें गहू सर्वदा।
काव्यें कोटिशतें प्रबंध रसना बोले जशी शारदा ।
संतांचे निजमंडळी यदुकुळी स्वानंदबिंदी मुदा ।।७२।।

अर्थात्, राजाराम छत्रपतीची स्त्री ताराबाई हिचा प्रस्तुत कवीस आश्रय होता.

।। श्री विश्वनाथो विजयते ।।